दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १११ वा शुक्रवार दि.०४ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

दर रविवार, चलो बुद्ध विहार अभियान अंतर्गत कसबे तडवळे येथे सामूहिक बुद्ध वंदना संपन्न.

लातूर :- भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या क्रांती भूमीवर म्हणजेच कसबे तडवळे येथे सामूहिक बुद्ध वंदना संपन्न झाली. बुद्ध विहार विकास निर्मिती तथा समाजातील उपासक उपासिका, तरुण वर्गात धम्म संस्कार रुजवीण्यासाठी पु. भंतेजी पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शन खाली दर रविवार चलो बुद्ध विहार अभियान अंतर्गत ३९ वी सामूहिक बुद्ध वंदना कसबे तडवळे स्थित वैशाली बुद्ध विहार भिम नगर येथे संपन्न झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २२ आणि २३ फेब्रुवारी १९४१ रोजी कसबे तडवळे (धाराशिव) येथे दोन दिवसीय मांग-महार वतन परिषद घेऊन खूप मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्याही एका जातीसाठी लढा दिला नसून, समूळ जातीअंतासाठी आयुष्य भर लढा दिला आहे हे आपण विसरता कामा नये, समाजात एकी असावी बेकी नसावी, समाजातील सर्वांनी मिळून धार्मिक चळवळ पुढे न्यावी असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व महामानवांच्या प्रतिमेंना पुष्पाने, धुपाने तथा दीपाने वंदन करण्यात आले, त्रिरत्न वंदनेनंतर, उपस्थित सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्तविक डॉ. अरुण कांबळे यांनी केले तसेच कसबे तडवळे येथील ऐतिहासिक पार्श्वभूमी व स्मारकासंबंधीतील माहिती तसेच या अभियानाबद्दलचे मार्गदर्शन आनंद सोनटक्के व तेजेस भालेराव यांनी केले.

सूत्रसंचालन मिलिंद धावारे यांनी केले तर आभार जयशील भालेराव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दत्तात्रय निकाळजे, तेजेस भालेराव, प्रसेनजीत सोनवणे, जगन्नाथ भालेराव, दत्ता निकाळजे, चंदू भालेराव, धनाजी भालेराव, मारूती सोनवणे, हेमंत निकाळजे, सुर्यचंद्र सोनवणे, समाधान भालेराव, लक्ष्मण सोनवणे, सुरज भालेराव, बाबा भालेराव, दुशांत सोनवणे, सुधाकर निकाळजे, स्वप्नील भालेराव, प्रतिश भालेराव, चंद्रकांत बनसोडे, सिंबा हिंगे, दिपक निकाळजे, सुधाकर जानराव, वामन सोनवणे, विलास भालेराव, संताजी निकाळजे, संजय भालेराव, भाऊराव सोनवणे, वैभव भालेराव, अजित निकाळजे, गंगाधर सोनवणे, अमित ढावारे, बबलू भालेराव, विपूल भालेराव, सारिपुत्र भालेराव, सतीश निकाळजे, पराज सोनवणे, शंकर भालेराव, महात्माजी काकडे, अतूल सोनटक्के, नंदू सोनवणे, भारत भालेराव, सुधीर निकाळजे सोपान निकाळजे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी बौद्ध उपासक, उपासिका तसेच बालक, बालीका यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

दुय्यम निबंधक क्र.२ मधील अधिकारी ज्यांनी खोटा दस्त नोंद केला यांच्यावर गुन्हे दाखल करा.

लक्ष्मीछाया औसेकर यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरअमरण उपोषण.

लातूर :- दुय्यम निबंधक क्र.२ मधील अधिकारी ज्यांनी खोटा दस्त नोंद केला यांच्यावर गुन्हे दाखल करा. लक्ष्मीछाया औसेकर यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरअमरण उपोषण

दुय्यम निबंधक कार्यालय क्र.२ मध्ये चुकीच्या पद्धतीने झालेला खरेदी दस्त क्र. ७३१९/२४ हा दस्त रद्द करून संबंदितांवर व दुय्यम निबंधक क्र.२ मधील अधिकारी ज्यांनी हा दस्त नोंद केला यांच्यावर गुन्हे दाखल करा १४ अ कन्हेरी. तुकडाबंदी कायदा लागू असताना १२ आर क्षेत्रापैकी ६ आर क्षेत्राचा तुकडा झाला कसा त्यास कोणताही अकृषि परवाना (महानगरपालिका अकृषी परवाना) व भूमिअभिलेख कार्यालयाचा मोजणी नकाशा व तत्सम कार्यालयीन अकृषी परवाना काहीही जोडलेले नाही माझे पत्र क्र.दि. १०-९-२०२४. माझे पत्र दि. १०-९-२०२४ अन्वये व पुनश्चस्मरण पत्र सादर केले. दि. २३-९-२०२४ दुय्यम निबंधक क्र. २ यांच्याकडे दस्त क्र. ७३१९/२४ हा दस्त दि. ४-८-२०२४ रोजी रुक्साना वासिम शेख यांनी मौजे. कन्हेरी येथील गट क्र. १४ अ मधील ६ आर क्षेत्र सय्यद मसूद मुसा कादरी यांच्या हक्कात बोगस महानगरपालिका आठ 'अ' सोबत जोडून, कुठल्याही प्रकारचा महानगरपालिका अकृषी परवाना, महानगरपालिकेचा मंजूर नकाशा व इतर मालकी हक्क कागदपत्रे न जोडता खरेदीदस्त करून दिला. दुय्यम निबंधक कार्यालय क्र. २ यांनी हा दस्त करून दिला. असे वाटते आर्थिक देवाण-घेवाण करून चुकीच्या व अनाधिकृत पद्धतीने नाँद केला गेलेला आहे. यात लिहून घेणार- लिहून देणार व मा. दुय्यम निबंधक कार्यालय क्र. २ यांनी संगणमताने सदर कृत्य केल्याचे कळते व यामध्ये मोठ्या रक्कमेची आर्थिक देवाण-घेवाण करीत दस्त नोंद केल्याचे लाजिर्वाणी कृत्य केल्याचे कळते.

मा. जिल्हाधिकारी साहेब सामान्य माणसाला खरेदीदस्त करताना डोळ्यांत पाणी येईल एवढे कागदपत्रे द्यावी लागत आहेत. १) मोजणी नकाशे (सत्यप्रत), मंजुरीनकाशा सत्यप्रत, सात-बारा सत्यप्रत, महानगरपालिका आठ 'अ' सत्यप्रत ही सगळी कागदपत्रे देऊनही लवकर दस्त नोंद होत नाहीत. असे असताना रुक्साना वासिम शेख व सय्यद मसूद मुसा कादरी यांच्यासारखे लोक महानगरपालिकेचे खोटे आठ 'अ' जोडून दस्त नोंद करून देतात. आठ 'अ' क्र. इ१-४९४४ हा आठ 'अ' अभिमन्यु गणपती कोल्हे यांच्या नावाचा असून हा आठ 'अ' रुक्साना वासिम शेख या नावाचा खोटा तयार करून दस्तास जोडलेला आहे. जो की खूप मोठा गुन्हा आहे. हा गुन्हा करताना व दस्त नोंद करताना मा. दुय्यम निबंधक क्र. २ यांनी कोणत्याही सत्यप्रति न घेता व कागदपत्रे पडताळणी न करता हा दस्त नोंदविला. मे. साहेब याहीवर खोट्या दस्ता आधारे फेरफार पण झाला. म्हणजे तेथेही खूप मोठी आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची दिसते. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावे जोपर्यंत गुन्हा दाखल होणार नाही तोपर्यंत मी माझेअमरण उपोषण करणार.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत चाकूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा शुक्रवारी भूमिपूजन सोहळा !

चाकूर प्रतिनिधी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत चाकूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता सोसायटी चौकात आयोजित करण्यात आलेला आहे .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदपूर -चाकूर विधानसभा मतदारसंघाचे आ.बाबासाहेब पाटील हे असून या कार्यक्रमाचे उद्घाटक दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य मंत्रालयाचे अध्यक्ष ना. बच्चुभाऊ कडू यांच्या शुभ हस्ते होणार आहे.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे,विधान निवडणूक प्रमुख लातूर शहर डॉ. सौ.अर्चनाताई पाटील चाकूरकर,भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके पाटील,भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष गोपाळ माने ,माजी आमदार बाबूराव खंदाडे, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ चौगुले,आठवले गट रिपाईचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे,माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष रामभाऊ तिरुके,नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतीक लंबे,उपनगराध्यक्ष अरविंद बिराजदार, अभियंता श्री बेलकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक चाकूर नगरपंचायतचे नगराध्यक्ष कपिल माकणे हे असून त्यांनी शहरातील सर्व नागरिकांना या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आव्हान केलेले आहे.चाकूरसाठी ही पाणीपुरवठा योजना रुपये ७५.४९ कोटीची असून या योजनेमुळे चाकूर शहराला मुबलक पाणीपुरवठा होणार असून भविष्यात शहरवासीयांना कसल्याही प्रकारची पाणीटंचाई जाणवणार नसल्याची माहिती नगरपंचायतीचे त्यांनी यांनी दिली आहे. तसेच या कार्यक्रमासउपस्थित राहण्याचे आवाहन नगराध्यक्ष कपिल माकणे यांनी केले आहे.

लातूरचा ऐतिहासिक सामुदायीक दसरा महोत्सव स्वागताध्यक्षपदी आ.रमेशआप्पा कराड यांची निवड

शहराध्यक्ष ईश्वर बाहेती, ग्रामीण अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापुरकर यांच्यासह अनेकांच्या निवडी जाहीर

लातूर : - दसरा धार्मीक सणा बरोबरच राष्ट्रीय सण असून क्षात्रतेजाचे दर्शन घडविणारा लातूर शहरात गेल्या एक्कावन वर्षापासून सामुदायीक दसरा साजरा करण्याची चांगली परंपरा चालत आलेली आहे. यावर्षीचा ५२ वा सामुदायीक दसरा महोत्सव साजरा करण्यासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या असून या महोत्सवाचे स्वागताध्यक्षपदी आ. रामेशअप्पा कराड यांची निवड करण्यात आली आहे तर कार्याध्यक्षपदी जयप्रकाश दगडे शहराध्यक्षपदी ईश्वर बाहेती व ग्रामीण आध्यक्षपदी प्रदीप पाटील खंडापुरकर यांची निवड करण्यात आलेली आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी सामुदायीक दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याच्या अनुषंगाने आर्य समाजचे प्रधान शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत लातूरच्या सामुदायीक दसरा महोत्सव दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी भव्य दिव्य मोठ्या प्रमाणात साजरे करण्याचे सर्वानुमते निश्चित करण्यात आले. विविध पदाधिकाऱ्यांच्या एकमताने निवडी जाहीर करण्यात आल्या. त्यानुसार या महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी आ. रामेशअप्पा कराड यांची निवड करण्यात आली आहे तर शहराध्यक्षपदी ईश्वर बाहेती व ग्रामीण अध्यक्षपदी प्रदीप पाटील खंडापुरकर, कार्याध्यक्षपदी जयप्रकाश दगडे आदीसह अनेकांच्या निवडी करून त्यांच्यावर जबाबदारी देण्यात आली.

दसरा महोत्सवात लातूर शहर आणि ग्रामीण असे दोन विभाग नियोजना साठी करण्यात आले असून शहर विभाग शहराध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते ईश्वर बाहेती यांची तर ग्रामीण विभाग अध्यक्षपदी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदिप पाटील खंडापुरकर यांची निवड करण्यात आली. मुख्य संयोजकपदी वीर योद्धा संघटनेचे राज्य अध्यक्ष श्रीकांत रांजणकर कार्याध्यक्षपदी जयप्रकाश दगडे तसेच कोषध्यक्षपदी पतंजली योग समिती राज्याचे प्रभारी विष्णुजी भुतडा, शहर प्रमुख संयोजक संतोष तोष्णीवाल संयोजक ड. विजयकुमार सलगरे, सरचिटणीस पदी व्यंकटेश हालिंगे यांची तर उपाध्यक्षपदी ड.गोपाळ बुरबुरे, रमाकांत बुरबुरे, प्रताप देशमुख सुरेश गोजमगुंडे, शेतकरी संघटनेचे दगडूसाहेब पडिले, भाजपाचे गुरुनाथ मग्गे, वनश्री मित्र मंडळाचे अध्यक्ष अजय गोजमगुंडे, आर्य समाज गांधी चौक अध्यक्ष ओमप्रकाश पाराशर, उपाध्यक्ष भारत माळवदकर, राजाराम ठाकूर, गोपाळ बुरबुरे, राम नगर आर्य समाजचे अध्यक्ष शंकरराव मोरे, हणमंत कोळेकर, शिवलिंग कुरे, अशोक पवार, दयानंद भालकीकर, वैजनाथ हालींगे, बाबू आप्पा सोलापुरे यांची निवड करण्यात आली. सहकोषाध्यक्ष पदी दिलीप कानगुले यांची निवड करण्यात आली. ग्रामीण प्रमुख संयोजक नीलकंठ साळुंके पाटील, महादेव खंडागळे, गोविंद जाधव, यांच्या निवडी जाहीर केल्या आहेत.

महिला दसरा महोत्सव अध्यक्षपदी ड. राणीताई स्वामी, कार्याध्यक्ष योगिताताई ठाकूर , उपाध्यक्ष सुवर्णाताई नाईक, काशीबाई हांडे, शीतलताई तम्मलवार सेक्रेटरी स्वेताताई परदेशी संघटक प्रितीताई कोळी सह कार्याध्यक्ष, मीनाक्षीताई दोरवे सहसंघटक, जानव्ही पेंडसे मुख्य संघटक तर सरचिटणीस पदी भातलोंडे, जयश्री भुतेकर सचिव रेखा खंदाडे सचिव तर रेश्मा होळकर सह सचिव, संयोजक मोक्षदा भंडारकोटे, सुरेखा गाडेकर संयोजक कल्पना बाबर संयोजक तसेच अमरजाताई गरड युवती अध्यक्ष ड. राधिका पाटील, दिव्या गिरी युवती कार्याध्यक्ष, दसरा महोत्सव युवक मंडळ अध्यक्षपदी आकाश गडगिळे, मुख्य संघटकपदी अमोल नान्नजकर, युवा अध्यक्ष अजय रेड्डी, कार्याध्यक्ष नितीन मोहनाळे, कायदेशीर सल्लागार मंडळाचे मुख्य संयोजक अँड विजयकुमार सलगरे, संयोजक अँड दिपक बनसुडे ड अभिषेक बुके, ड सतीश भालेराव, ड.योगेश बनसुडे, प्रसीद्धी समिती प्रमुख दयानंद जडे, विनोद चव्हाण, बालाजी गाडेकर, महेश गाडेकर, संघटक , संघटक संदीप पुणेकर, मिरवणूक समिती प्रमुख ओम गोपे, बाळासाहेब रेड्डी, महादेव कानगुले, अभिषेक पतंगे, राजाराम ठाकूर, मिरवणूक संयोजक राजेंद्र बनारसे, दत्ता सुरवसे, सुभाषप्पा सुलगुडले, बालाजी शेळके, महावीर काळे, रमाकांत बुरबुरे दासराव पाटील, हर्षवर्धन आकनगिरे, राजेंद्र दिवे, आनंत लोखंडे, रमेश्वर राउत, युवक मंडळ मिरवणूक समिती प्रमुख अजय रेड्डी, ऋषी चौहाण, रोहन जोशी, सुरक्षा समिती प्रमुख गणेश छत्रे आदिनाथ पवार, नवनाथ ढेकरे, विनोद रेड्डी, आदित्य होणे व ग्रामीण युवा अध्यक्ष तुषार रेड्डी, श्रावण रावणकुळे ग्रामीण उपाध्यक्ष, आदित्य कासले ग्रामीण संयोजक नेताजी जाधव ग्रामीण सरचिटणीस, राम पवार ग्रामीण सहसचिव दीपक भारती, श्री जुन्नी, शहर युवा संयोजक वैभव मिश्रा इत्यादींच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

या प्रसंगी बैठकीचे अध्यक्ष शंकरराव मोरे यांनी दसरा उत्सव अनुषंगाने मार्गदर्शन केले व निवड झालेल्या सर्व पदाधिकार्यांना शुभेच्छा दिल्या. बैठकीचे प्रास्ताविक व्यंकटेश हलिंगे यांनी केले तर सूत्रसंचालन दिलीप कानगुले यांनी केले व शेवटी उपस्थितांचे मुख्य संयोजक श्रीकांत रांजणकर आभार मानले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

संपादकीय....

महाशक्तीचे स्वबळ

'महाराष्ट्रात यावेळी होणार्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीचे सरकार सत्तेवर येईलच ; पण त्यानंतर पाच वर्षांनी येणार्या निवडणुकीमध्ये एकट्या भाजपचे सरकार सत्तेवर येईल', असा दावा भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केल्यामुळे सध्या महायुतीचे घटक पक्ष असलेले विविध पक्ष आणि त्यांचे नेते अस्वस्थ झाले नसतील तरच नवल. साधारण अडीच वर्षांपूर्वी जेव्हा एकदाच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांनी शिवसेनेच्या विरोधात बंड करून गुवाहाटी येथे जाऊन संपूर्ण व्यूहरचना केली होती तेव्हा एकनाथ शिंदे यांनी आपल्या सर्व भाषणांमध्ये नेहमीच 'आपल्यामागे महाशक्ती उभी' असल्याची घोषणा केली होती. ती महाशक्ती म्हणजे भारतीय जनता पक्ष होता. पण आता हीच महाशक्ती महायुतीपेक्षाही स्वतःचे बळ आजमावण्यावर भर देत आहे हे एकनाथ शिंदे यांनी लक्षात घेण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये भारतीय जनता पक्षाने कधीही निवडणुकीत स्वबळ महत्त्वाचे आहे ही आपली महत्त्वाकांक्षा लपवलेली नाही. खूप पूर्वीपासून भाजपने 'शतप्रतिशत भाजप' हा नारा दिला आहे. राजकीय अपरिहार्यतेमधून किंवा काही राज्यांमध्ये सत्ता मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेतून भारतीय जनता पक्षाने अनेक नवीन मित्र केले असले, तरी नंतर भारतीय जनता पक्षाने नेहमीच 'शतप्रतिशत भाजपा'चा नारा देऊन त्या राज्यामध्ये स्वबळावर सत्ता मिळवण्यासच प्राधान्य दिले आहे. याच भूमिकेतून भारतीय जनता पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्यातील संबंधही ताणले गेले होते आणि ते अखेर तुटले. आता जो अनुभव उद्धव ठाकरे यांना काही वर्षांपूर्वी आला होता तशाच प्रकारचा अनुभव येत्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना येऊ शकतो, असेच संकेत अमित शहा यांच्या या विधानामुळे मिळत आहे. गेल्या आठवड्यामध्ये नागपूर येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यामध्ये बोलताना अमित शहा यांनी 'महायुतीला बरोबर घेऊन आपल्याला राज्यात सत्ता मिळवायची आहे', अशी घोषणा केली होती. पण त्यानंतर आठच दिवसांच्या कालावधीमध्ये त्यांनी '२०२९ मध्ये फक्त भाजपचे सरकार राज्यात असेल' अशी घोषणा केली आहे. हा बदलही लक्षात घेण्यासारखा आहे. अर्थात यावेळी म्हणजे २०२४ मध्ये होणार्या विधानसभा निवडणुकीमध्ये मात्र महायुती एकत्रपणे काम करेल आणि सत्तेवर येईल असे जरी त्यांनी म्हटले असले, तरी आणखी पाच वर्षांनी काय होऊ शकते याची चुणूक मात्र या निमित्ताने त्यांनी एकनाथ शिंदे, अजित पवार आणि इतर मित्र पक्षांच्या नेत्यांना दाखवून दिली आहे. देशातील कोणत्याही राज्यामध्ये भारतीय जनता पक्षाने तेथील प्रादेशिक पक्षाबरोबर जर युती केली असेल, तर काही कालावधीनंतर त्या प्रादेशिक पक्षाचे महत्त्व कमी करून स्वतःचे महत्त्व वाढवून शतप्रतिशत पद्धतीने त्या राज्यामध्ये स्वतःला प्रस्थापित करण्याचे काम भारतीय जनता पक्षाने नेहमीच केले आहे. महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाल्यास आज राज्यामध्ये भारतीय जनता पक्ष हा सर्वात मोठा पक्ष आहे. हा पक्ष एकेकाळी चार नंबरवर असायचा. आता त्या पक्षाने पहिल्या नंबरवर आघाडी घेतली असल्यामुळे स्वबळावर सत्ता मिळवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा असणारच आहे. येत्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रात कोणत्या राजकीय घडामोडी घडू शकतील याचा कोणताच अंदाज नसतानाही केवळ कार्यकर्त्यांना एक टार्गेट देण्याच्या दृष्टिकोनातूनच अमित शहा यांनी हे विधान केले आहे हेसुद्धा उघड आहे. गेल्या १० ते १२ वर्षांच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रात आपला पाया भक्कम करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने इतर राजकीय पक्षांमधील प्रमुख नेत्यांना आपल्या पक्षामध्ये ओढण्याचे काम केले. त्याचा फायदा म्हणजे गेल्या दोन निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या जागा वाढल्या होत्या. पण आता गेल्या काही महिन्यांतील घडामोडींवर जर नजर टाकली, तर भारतीय जनता पक्षामध्ये जे इन्कमिंग होत होते ते थांबले आहे, उलट आउटगोइंग वाढले आहे. भारतीय जनता पक्षाच्या जागांमध्ये वाढ होण्यामध्ये इतर राजकीय पक्षांमधील प्रमुख राजकीय नेत्यांचा सहभाग होता हे राजकीय वास्तव आहे. पण आता इतर राजकीय पक्षांमधील नेते आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करण्यासाठी फारसे उत्सुक राहिलेले नाही हे दुसरे वास्तवही या निमित्ताने लक्षात घ्यावे लागणार आहे. त्याबद्दलच्या राजकीय परिस्थितीची जाणीव निश्चितच शहा आणि फडणवीस यांच्यासारख्या नेत्यांना आहे. म्हणूनच यावेळच्या निवडणुकीमध्ये महायुती म्हणून सत्ता मिळवत असतानाच त्यापुढच्या निवडणुकीमध्ये फक्त भाजपची सत्ता आणण्याचे टार्गेट त्यांनी कार्यकर्त्यांना दिले आहे. अर्थात, २०२९ मध्ये होणार्या निवडणुकीनिमित्ताने विनाकारण मित्रपक्षांमध्ये राजकीय घबराट निर्माण करून त्याचे यावेळच्या निवडणुकीवर जर नकारात्मक परिणाम झाले, तर काय होऊ शकते याचाही विचार या नेत्यांनी करायला हवा. यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या प्रकारे भारतीय जनता पक्षाच्या जागा कमी झाल्या आणि पुन्हा स्वबळावर सत्ता मिळवण्याचे स्वप्नही भंगले. ते पाहता कोणत्याही परिस्थितीत पुन्हा एकदा केंद्रात आणि महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये स्वबळावर सत्ता मिळवण्याचे ध्येय भारतीय जनता पक्षाने बाळगलेले दिसते. अमित शहा यांनी केलेल्या या घोषणेवर अद्याप एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली, तरी त्यांच्याही मनामध्ये कदाचित एखादी वेगळी रणनीती आकाराला येऊ लागली असेल. अमित शहा यांच्या या घोषणेमुळे भाजपच्या कार्यकर्त्यांना निश्चितच बळ मिळेल; पण मित्र पक्षांच्या नेत्यांमध्ये मात्र अस्वस्थतेची भावना वाढीस लागणार आहे, हे निश्चित.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या स्थापनेला ६७ वर्ष पुर्ण

आजच्या तरुणांना रिपब्लिकन पक्ष कोणाचा आहे असे विचारले तर काय उत्तर मिळेल?.ते ऐकण्याची तयारी कोणाचीच नसणार,कारण त्यांच्या आजू बाजूच्या नगरातील विभागातील कार्यकर्ते नेते दररोज सकाळी कुठे भेटतात आणि संध्याकाळी काय करतात.त्यांचे उधोगधंदे व उत्पन्नाची साधन व मार्ग कोणते यांची पूर्ण कल्पना विभागातील समाजाच्या लोकांना असते.त्यांनी जर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतिकारी तत्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला तर लोक त्यांच्याकडे तिरक्या नजरेने पाहतात.कारण क्रांतिकारी विचाराचे आचारण कुठेच दिसत नाही.दलाली,गुलामगिरी आणि लाचारी नसानसात भरलेली माणस जेव्हा स्वाभिमानाची गोष्ट करतात,तेव्हा जवळची लोकच त्यांच्याकडे संशयाने पाहतात.ते तसे जगण्यासाठीच एकाच नगरात एकाच गटाशी प्रामाणिक राहत नाही,तथागत बुद्ध वाचनालय काढतील पण त्यावर बुद्ध आंबेडकर यांच्या फोटो पेक्षा राष्ट्रवादी नेत्याच्या भाऊ,वहिनी,आईचा फोटो किती महत्त्वाचा आहे हे नगरातील विभागातील लोकांना दाखवुन देतील.त्याला स्वाभिमानी, आंबेडकरी विचारांचे माणस विरोध करण्याचे धाडस कधीच करत नाहीत.मागे जरूर बोलतील पण समोर नाही.मूर्ख आहे तो! त्यांच्या कशाला नादी लागावे असे म्हणूनच त्याला सोडून देतील.पुढे जयंतीला,वर्षावास समारोप,महापरिनिर्वाण दिनाला भोजन दान व बॅनर त्यांच्या कडुनचं आर्थिक मदत मात्र न चुकता घेतील.त्यामुळे नगरात विभागात रिपब्लिकन कार्यकर्ता नेता जातीने व कार्याने ओळखला जातो.आज माझी मुले विचारतात रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट काय होते?. ते कुठे दिसते काय ? प्रत्येक नेत्याचे समाजा बाबत काय मत आहे हे जर ऐकले तर लढावे की रडावे हाच प्रश्न पडतो.

क्रांतिकारी विचाराचा शब्द रिपब्लिकन आणि बहुसंख्येने असलेला समाज म्हणजे हत्ती सारखी शक्ती तीच आपली निशाणी.कुठे आहे?.साठ वर्षात आम्ही हा इतिहास किती वाचला,समजला आणि आचरणात आणला?.भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत नाव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे आहे.भारतीय रिपब्लिकन पक्ष हा भारतातील शोषित पिडीत आदिवाशी मागासवर्गीय समाजाचा म्हणजे बहुजन समाजाचा रिपाई म्हणूनच ओळखला जातो.तसा भारतातील सर्वात मोठी संख्या असणाऱ्या समाजाचा हा राजकीय पक्ष आहे. डॉ.भिमराव आंबेडकरांनी सुरू केलेल्या शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन या सामाजिक संघटनेतून हा पक्ष उदयास आला.या पक्षाचे मुख्य बलस्थान महाराष्ट्र होते.शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन या सामाजिक संघटनेने राजकारणात उतरून निवडणुकीत भाग घेतल्यामुळे अनेक समाजाचे समीकरण बदललेले होते. त्याचमुळे त्याची राजकीय पक्षात गणती होत होती.आज तो सत्ता मिळवुन देणारा समाज म्हणूनच ओळखला जातो.

शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन या सामाजिक संघटनेतून राजकीय पक्ष.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ही संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची होती.त्याच्या महापरी निर्वाणा नंतर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी त्यांच्या निष्ठावंत अनुयायांनी रिपाईची स्थापन केली.पण सुरवात पासूनच या पक्षाचा संपूर्ण इतिहासच अहंकाराचा आणि फाटाफुटींनी भरलेला आहे. तेव्हा पासून आज पर्यंत दररोज रिपब्लिकन हा शब्द असलेला एक राजकीय पक्ष (गट) स्थापन होतो आणि पुढे तो फुटतो,असे या ऐतिहासिक रिपाई प्रक्रियेचे एकूणच वर्णन करता येईल. त्यामुळेच रिपब्लिकन पक्ष त्यांच्या अंतिम उद्धिष्ठा पर्यंत पोचला नाही.भारताला आणि भारतीयांना कठीनातील कठीण प्रश्न,समस्या सोडविण्यासाठी बाबासाहेबांनी लोकशाही दिली.संविधानाची योग्य अमंलबजावणी केली तर कोणत्याही समस्या सुटू शकते.हे त्यांनीच आत्मविश्वासाने सांगितले होते.पण रिपाई ने त्याला महत्व न देता स्वार्थ व अहंकार या शब्दाला यांनी खूप महत्व दिले आहे.म्हणून आज ही यांची संपूर्ण इमारत त्यावरच उभी आहे.बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ बौद्ध धम्माची दिक्षा देताना त्यात त्यांनी त्रिसरण,पंचशील,आणि बावीस प्रतिज्ञा दिल्या होत्या हे सर्वच कार्यकर्ते नेते विसरले आहेत.म्हणून रिपाई किंवा इतर समाजिक,धार्मिक संघटना नेहमी अहंकारा पायी फुटतात असे म्हटले तर चूक ठरणार नाही. त्यांनी संविधान मान्य केले असते तर आज रिपब्लिकन समाज रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ठ गाठण्याच्या स्पर्धेत असता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष म्हणून ओळखणारा रिपाई पहिल्यांदा फुटला तो १९५८ साली.म्हणजे पक्ष स्थापने नंतर एक वर्षांच्या आतच.तेव्हा ही नेतृत्व कुणी करायचे,यावरूनच पक्ष फुटला होता.त्यातून खोब्रागडे –गायकवाड आणि कांबळे–रूपवते असे दोन गट निर्माण झाले.१९६४ मध्ये गायकवाड गटातून आर. डी.भंडारे बाहेर पडले तर १९६५ मध्ये कांबळे गटात फूट पडून रूपवते बाहेर पडले आणि गायकवाड गटाशी त्यांचे ऐक्य झाले.म्हणजे ज्यांना विरोध केला त्यांच्या कडेच गेले.पुढे आर.डी.भंडारे आणि रुपवते काँग्रेसवासी झाले.त्यानंतर आजपर्यंतचा या पक्षाचा संपूर्ण प्रवास फाटाफूट आणि ऐक्य यांनी रंगलेला आहे. वारंवार झालेल्या या फाटाफुटी व ऐक्यामुळे 'फूट' आणि 'ऐक्य' या दोन्ही शब्दांचे रिपब्लिकन चळवळीच्या संदर्भातले गांभीर्यच नष्ट झाले आहे.आता पर्यंत या पक्षाची ५० हून अधिक छकले झाली आहेत, आणि अशा प्रत्येक छकलाचा एक स्वतंत्र राजकीय पक्ष झाला.रिपाई नांवा शिवाय हे स्वताचे अस्तित्व दाखऊ शकत नाही.

क्रांतिकारी विचारांच्या आंबेडकर अनुयायाची आत्मपरीक्षण करण्याची तयारी नसल्यामुळे मी बरोबर बाकी सर्व चूक हे सिद्ध करण्यात या नेत्यांनी आपली व्यापक रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात येऊच शकत नाही ?. ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या आंबेडकरी चळवळ संपली आहे पुस्तकरुपी निष्कर्षा नंतर त्यांनी आंबेडकरी विचारांचे चळवळीचे काम करणे सोडून दिले आणि डाव्या विचाराच्या विविध गटांना जवळ करून नक्षलवादी विचाराच्या तरुणाना जाहीर पाठिंबा दिला त्यातूनच महाराष्ट्र लोकशाही आघाडी निर्माण झाली होती.आता तर सर्व समाज आणि कार्यकर्ते नेते विचारापासून वंचित झाले आहेत.आणि त्यांची वंचित घटकांची वंचित बहुजन आघाडी राज्यात एक वेगळे राजकीय पटावर स्थान निर्माण करीत आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडें सारखा प्रामाणिक नेता खासदाराचे मागच्या दराने आमदार झाले. आणि रिपाई मधील उरला सुरला प्रामाणिकपणा संपवला.रिपब्लिकन चळवळ नावापुरती शिल्लक राहली असा धोक्याचा गंभीर इशारा देणाऱ्या बाळासाहेबांनी आंबेडकरी चळवळीच्या वाताहताची शोधून काढलेली कारणे आणि मांडलेले निष्कर्ष पाहता त्यावर सविस्तर चर्चा खूप झाली.पण ते केवळ कार्यकर्त्यांच्या लेवलवर,ती बुद्धीजीवी वर्गाच्या पातळीवर झाली असती तर समाजाला नेमकी दिशा देता आली असती.परंतु बहुसंख्य बुद्धीजीवी भिती पोटी सत्य मांडण्याचे धाडस करीत नाही. अनेकांनी आंबेडकरी चळवळ संपली नसल्याचे दावे केले,पण तिच्या जीवंतपणाची लक्षणे कोणती ह्याबाबत ठामपणे स्पष्टीकरण दिले नाही.आज आंबेडकरी चळवळीचे बालेकिल्ले संपूर्णपणे उध्वस्थ झालेले (वैचरिक पातळीवर) स्पष्ट दिसतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल एक पत्र १ ऑक्टोबर १९५७ रोजी 'प्रबुध्द भारत' मध्ये भारतीय जनतेला उद्देशून प्रसिद्ध झाले होते. हे पत्रच रिपब्लिकन पक्षाची घटना मानली जावी असा सर्व नेत्याचा आग्रह होता.त्यात न्याय,समता,स्वातंत्र्य आणि बंधुता हि पक्षाची ध्येय असतील,पक्षाच स्वरुप प्रादेशिक न राहता ते देशव्यापी असेल असे स्पष्ट करुन,आपल्या अनुयायांना बाबासाहेब सांगतात, 'हा पक्ष देशातील सर्व कष्टकरी मागासवर्गीय समाजातील शोषित,वंचित,पिडीत जनतेच्या हिताचा रक्षणकर्ता असेल.अनुसूचित जाती–जमाती,बौद्ध आणि मागासवर्गीय लोकांच्या हितासाठी प्रयत्न करण्याची बांधिलकी स्विकारलेला असेल.शासनकर्ती जमात बनतांना जो पक्ष आपल कल्याण करील,त्यांच्याशी हातमिळवणी करावी. दुस–या पक्षाशी सहकार्य करतांना आपला पक्षाच्या तत्वज्ञान,ध्येय आणि उदिष्ट यांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी.नेता एकच असावा आणि पक्षही एकच असावा.पक्षाच चिन्ह हत्ती हे बुद्ध संस्कृती मधिल प्रतिक तर,अशोक चक्रांकित निळा झेंडा हे निशाण असे बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या पक्षाबद्दलचे मत स्पष्टपणे मांडलेले होते.हा इतिहास आजचा तरुण वाचायला तयार नाही.म्हणून तो इतिहास वाचून इतिहास घडविण्यास तयार नाही.तो दिशाहीन झाला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर ३ ऑक्टोबर १९५७ साली बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची नागपूर दिक्षा भूमीवर स्थापना झाली होती.त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणूकात पक्षाने दैदिप्यमान, नेत्रदिपक यश संपादन केले होते.त्यावेळी त्याची राजकीय शक्ती प्रभावशाली आणि सर्व समाजाचे लक्षवेधनारी होती,त्यात सतर टक्के असंघटीत कष्टकरी मजूर,शेतमजूर, कामगार होता.त्यांचा नेत्यावर विश्वास होता.पण त्यानंतरच्या काळात बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचाराचा नेत्यांना विसर पडला आणि युती आघाडी वर भर देण्यात आला.त्या काळी एका मान्यताप्राप्त नेत्याचा एक मंत्र होता गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली.बाबासाहेब आंबेडकरांनी उभी केलेली पोलादी, प्रभावशाली,बलाढ्य एकसंघ असलेली संघटना,रिपब्लिकन पक्षाची चळवळ सामाजिक,राजकीयदृष्ट्या सक्षम नेतृत्वा अभावी,मतभेद,अहंकार,स्वार्थी राजकीय महत्त्वकांक्षापोटी फुटत गेली. इतर राजकीय पक्षांशी तडजोड करीत.प्रत्येक गटाचे नेतृत्व बेफिकीर,दिशाहीन बनत गेले.गटा तटाच्या निच राजकारणामुळे आपल्या समाजातील अनेक लोक इतर राजकीय पक्षात कार्यरत होत गेले.या सर्व घडामोडींवर बारीक लक्ष ठेवणारा फार मोठा बुद्धिजीवी वर्ग अलिप्त राहिला.आज आमचे काही दैनिक आहेत पण त्या दैनिकाच्या संपादकाचे आंबेडकरी चळवळी बाबत कोणत्याही विषयावर एक मत होत नाही.राजकीय नेत्या सारखे ते एकमेकाच्या जवळ बसून किमान एक कार्यक्रम बनवून समाजा समोर भूमिका मांडण्याची हिंमत दाखवत नाही. त्याच बरोबर आंबेडकरी विचारांची एक राष्ट्रीय ट्रेंड युनियन नाही जे देशातील तमाम कामगार,कर्मचारी आणि अधिकारी यांच्या दबावाखाली काम करेल.मग देशातील ९३ टक्के असंघटीत कामगार मजुरांचे समाज प्रबोधन कोण करेल?.

१९२७ ते १९५६ पर्यंत मागासवर्गीय शोषित वंचित समाज जो असंघटीत कामगार शेतमजूर होता तो असुशिक्षित अज्ञानी मोठ्या प्रमाणत होता.तरी तो डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक जनआंदोलनात अक्षरशः आपले जीवन कुर्बान करीत होता,समाजातील असंघटीत कामगार मजुरांच्या ध्येय धोरणांशी,कार्याशी आपण जितके प्रामाणिक राहू, तितकी बाबासाहेबांची चळवळ आपल्यात जीवंत राहिल.रिपब्लिकन पक्षाच्या गटा तटांना अनेकदा भावनिकतेवर आधारित ऐक्य करावे लागले आणि ते करण्यास भाग पडणारा कोणी पदवीधर प्राध्यापक,डॉक्टर,वकील, इंजिनियर नव्हता.आंबेडकर चळवळ संपली या छोट्या पुस्तकात लेखक बाळासाहेब आंबेडकर यांनी ऐक्यासाठी उपोषण करणारे कोण आहेत आणि त्याचे शिक्षण व रोजगार काय आहे हे नांवासह दिले आहे.सर्व असंघटीत कामगार मजूर होता.हे लक्षात घ्या.आताही त्यांनाच पुढाकार घ्यावा लागेल.कारण समाजात असंघटीत कामगारंचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढत आहे. त्यांच्या पाठीवर कोण कधी हात ठेऊन आपले करेल हे सांगता येत नाही.रिपाईच्या सर्व बालेकिल्ले कुठे आहेत हे शोधावे लागेल. अहंकार,मतभेद,प्रलोभन,अमिषापायी आंबेडकरी चळवळीतील सामाजिक,राजकीय निष्ठा गौण ठरत आहे. आज आपला सामाजिक,राजकीय पाया काय आहे?. ज्या क्रांतिकारी चळवळीला तत्वज्ञान आहे, क्रांतिकारी सामाजिक बांधिलकी असलेले कार्यकर्ते आहेत,परंतु त्याच समाजासमोर, चळवळीसमोर पर्याय नसल्याने आज अनेक प्रश्नचिन्ह आहेत.अत्याचार आणि भावनिक प्रश्नापुरती चळवळ फक्त लढते आहे.पण निकाल काय ?.संविधाना नुसार ग्रामपंचायत ते राष्ट्रपती पर्यंत निवडणुका होऊन निकाल लागतो.त्याकरिता भारतीय नागरिक म्हणून नांव नोंदणी झाली तरच मतदानाचा अधिकार असतो,ग्रामपंचायत सदस्य ते आमदार,खासदार कोण कोणाला कसे निवडून देते हे उठता बसता भारतीय घटनेच्या शिल्पकारांचे नांव घेणाऱ्या समाजाला सांगणे मला शोभणारे नाही.

डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या राजकीय पक्षाची आपण काय अवस्था करुन ठेवली आहे ? पक्षाची राजकीय मान्यता,निवडणूक चिन्ह ही आपण केव्हाच गमावून बसलो आहोत.अत्याचार,अन्याय,भावनिकता आणि बाबासाहेबांच्या नावाचे भांडवल करुन अजून किती सोयीच राजकारण आपण सर्व करणार आहोत?. राजकारणात बेरीज चालते,आपण तर वजाबाकी व भागाकार करीत आहोत.आपली निर्णायक बलाढ्य शक्ती असतांना,आपण राजकारणात अदखलपात्र का ठरु लागलो ? आंबेडकरी चळवळ राजकीय,सामाजिक चळवळीचे होत असलेले पतन आंबेडकरी अनुयायांना अभिमानास्पद आहे का ? प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रत्येक गटा तटाचा फायदा इतर राजकीय पक्षांना होणार असेल तर?. राजकारण कशासाठी,कोणासाठी आणि का करायचे ?.

३ ऑक्टोबर २०२४ रोजी,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या स्थापनेला ६७ वर्ष पुर्ण होत आहेत.काही रिपाई गटाची मान्यता रद्ध करण्यात आल्याचे आपण वाचले असेलच.कारण त्यांनी रीतसर हिसाब ठेवला नाही आणि सादर केला नाही.तीच परिस्थिती सामाजिक धार्मिक शौक्षणिक संस्था,संघटना यांची आहे.मग आता कोणता रिपाईचा गट बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचाराचे नेतृत्व करण्यास सक्षम आहे.

राज्यात आणि देशात एका रिपब्लिकन गटाचे नांव सतत चर्चेत असते.ते म्हणजे नामदार खासदार रामदास आठवले देशातील एकमेव नेता ज्यांना भेटण्यास कोणतीही वेळ व जागेचे बंधन नाही.वैचारिक शत्रूच्या कळपात जरी असले तरी त्यांनी आपला ठसा सर्व समाजात ठेऊन आहेत.त्यांच्या सोबत जो फौजफाटा आहे तो सर्वच क्षेत्रात संघर्ष आणि नेतृत्व करण्यास तयार असतो. रामदास आठवले यांची बहुजन समाजात रिपब्लिकन नेते म्हणून ओळख समाजमान्य आणि लोकमान्य आहे. हे माझे मत काहीना पटणार नाही. हे वाचून ते काही लोक हमखास शिवीगाळ करतील,हातपाय तोडण्याची भाषा करतील. कारण सध्या सत्य बोलायचे नाही,लिहायचे अशा विचाराची मानस तयार केली जात आहेत.रिपब्लिकन पक्षाचा वर्धापनदिन अधिकृत पणे साजरा करणारा एकमेव गट रामदास आठवले जरी असला.तरी तो रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट गाठण्यास असमर्थ आहे.कारण त्यांच्याही गटाला संविधान किती मान्य आहे हे त्यांच्या कार्यप्रणाली आणि जाहीर सभेच्या स्टेजवरील नेत्याच्या गर्दीवरून लक्षात येते. सर्वच रिपब्लिकन गटाचे नेतृत्व करणारे एक नंबर नेतृत्व सोडल्यास राज्यात दोन,तीन चार पाच नंबर राज्याचे नेतृत्व करणारे नेते नाहीत. प्रशिक्षित कार्यकर्ते नाहीत.लेटर हेड वर जगणारे कार्यकर्ते समाजाला स्वाभिमानी बना! सांगु शकत नाही. सरकारी योजनांची अभ्यासपूर्ण माहिती नाही.समाजाचा आणि जनतेला कसा लाभ मिळवुन द्यावा यावर जनांदोलन उभे न राहता स्वतःला किती कमिशन अथवा दलाली भेटलं यावर सर्व लक्ष केंद्रित असलेले कार्यकर्ते,नेते पक्षाला कोणती दिशा दाखवून पुढे नेतील?. त्यामुळेच असंघटीत कष्टकरी कामगार,मजूर,शेतमजूर मोठ्या संख्येने इतर पक्ष संघटने कडे वळतो आहे.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियमन करण्यासाठी व त्यांच्या सुरक्षा,आरोग्य व कल्याणासाठी उपाययोजना करण्याकरीता अधिनियम,नियम केंद्र व राज्य शासनाने निर्गमित केले आहेत.त्याद्वारे खेड्या पड्यात इमारत बांधकाम कामगारांची नांव नोंदणी मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यात आपला पक्ष,त्यांचे कार्यकर्ते नेते कुठे आहेत.याचा सर्वच जागृत कार्यकर्ता ,बुद्धीजीवी,साहित्यिकांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.

रिपब्लिकन विचारधारा किती हि चांगली असली तरी तिचे आचरण करणारे अनुयायी नसतील तर रिपाई रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट गाठूच शकत नाही.लोकशाहीचे बंधन मान्य नसणारे कार्यकर्ते लगेच पन्नास शंभर लोक सोबत घेऊन पक्ष संघटना काढत राहिले म्हणजे काय होईल?. तालुक्यात जिल्ह्यात संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष निर्माण होत राहतील.ते कोणाचे चमचे,दलाल,गुलाम असतील हे सांगता येणार नाही. म्हणून सर्व गल्लीबोळातील तरुणांनी प्रथम आपल्या विभागातील स्वार्थी,अहंकारी कार्यकर्ते संपविण्याची जबाबदारी घ्यावी. आणि आपल्या परीसारतील आंबेडकरी समाज एकसंघ करण्याचा प्रयत्न करावा.भारताला दिलेल्या लोकशाहीच्या मार्गाने नेता निवडावा जो लोकशाही मान्य करीत असेल आणि लोकशाहीने पक्ष संघटना चालवीत असेल तोच रिपाईचा नेता असेल.रिपाईच्या ३ ऑक्टोबर वर्धापन दिना निमित्य एक संकल्प तरुणानी केला पाहिजे. रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट कोणते ? ते ठरवुन काम केले पाहिजे.ते करण्यासाठी आत्मचिंतन आत्मपरीक्षण करून तरुणांना संधी दिली पाहिजे.

****

सागर रामभाऊ तायडे,
भांडूप मुंबई,
९९२०४०३८५९.

अशक्तपणा दूर करण्यासाठी आहारात या फळाचा करा समावेश

डाळिंब खाण्याचे अनेक फायदे आहेत आणि ते खाल्ल्याने अनेक आजारांचा धोकाही कमी होतो. यामध्ये असलेले फायबर वजन कमी करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. डाळिंबाचे सेवन आपल्या त्वचेसाठी आणि सांध्याच्या आरोग्यासाठी देखील चांगले आहे, कारण ते कोलेजन तयार करण्यास देखील मदत करते.

डाळिंब हे एक फळ आहे जे हिमोग्लोबिन वेगाने वाढवण्यास मदत करते. यासोबतच डाळिंबाच्या सेवनाने शरीराला अनेक फायदे होतात.

डाळिंब हे एक फळ आहे जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. डाळिंबात आढळणारे पोषक तत्व शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. डाळिंबाच्या सेवनाने शरीरातील हिमोग्लोबिन निर्मितीचा वेग लक्षणीय वाढतो. डाळिंब त्वचेसाठीही फायदेशीर आहे. ज्या लोकांची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांनी नियमितपणे डाळिंबाचे सेवन करावे, यामुळे त्यांची प्रतिकारशक्ती वाढेल.

डाळिंबात मुबलक प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात ज्यामुळे शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. जर तुम्ही दररोज ७ दिवस डाळिंबाचे सेवन केले तर तुम्हाला फरक जाणवू लागेल. जाणून घेऊया डाळिंब खाण्याचे ५ मोठे फायदे.

डाळिंब खाण्याचे ५ फायदे

हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर

डाळिंबातील अँटी–ऑक्सिडंट्स हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करतात. यामुळे खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

कर्करोगाशी लढण्यासाठी उपयुक्त

डाळिंबात आढळणारे अँटी–ऑक्सिडंट कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्यास मदत करतात. अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की डाळिंबाचा रस प्रोस्टेट कर्करोग आणि स्तनाचा कर्करोग यासारख्या विशिष्ट प्रकारच्या कर्करोगाचा धोका कमी करू शकतो.

प्रतिकारशक्ती वाढवते

डाळिंबात व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. हे शरीराला संसर्गाशी लढण्यास सक्षम करते. ज्या लोकांना रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे त्यांनी नियमितपणे डाळिंब खावे.

पचनसंस्था निरोगी राहते

पचनाशी संबंधित समस्यांनी त्रस्त लोकांसाठी डाळिंब खूप फायदेशीर आहे. डाळिंबात फायबर असते, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. हे बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते.

त्वचेसाठी फायदेशीर

डाळिंबातील अँटिऑक्सिडंट्स त्वचेला फ्री रॅडिकल्सच्या नुकसानीपासून वाचवतात. त्यामुळे त्वचा तरूण आणि चमकदार राहण्यास मदत होते. डाळिंब नियमित खाल्ल्याने चेहऱ्याची चमक वाढते आणि त्वचा चमकदार होते.

डाळिंब खाण्याचे तोटे

डाळिंब खाण्याचे जसे फायदे आहेत तसे तोटे देखील आहेत. कमी रक्तदाब असलेल्या रुग्णांनी डाळिंबाच्या रसाचे सेवन कमी प्रमाणात करावे. डायरियाच्या वेळी देखील डाळिंबाचा रस पिऊ नये. जर तुम्ही तुमच्या त्वचेवर डाळिंबाचा रस लावलात तर अनेकांना खाज सुटणे, सूज येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

निर्भीड निर्भय निपक्षपाती स्तंभ लेखक सागर तायडे

सागर तायडे यांच्या संदर्भात खर तर लिहीत असताना खूप बरे वाटते. त्याचे कारण की त्यांच्या लेखणी मधे सामन्य माणसाच्या वेदना कशा आहेत.त्यांना न्याय देण्यासाठी कोणत्या प्रकारची गरज आहे. आजपर्यंत ती गरीब माणसे न्याया पासून वंचित का राहिली. त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कोणते प्रयत्न व्हायला हवेत, ती ना होण्याची कारणे काय? भारतीय संविधानामध्ये ईतर मागासवर्गीय,मागासवर्गीय,अनुसूचित जमाती यांच्या प्रगतीच्या दृष्टीने तरतूद करण्यात आली असताना ती प्रगती च्या दिशेने जाण्यासाठी विलंब का होत गेला. त्याची कारणे काय? अश्या सर्व बाबतीत त्यांचे लिखाण बघितले तर खरच निर्भीडपणे लिहणारा लेखक,सामान्य माणसाच्या हितासाठी,कल्याणासाठी लिहणारा स्तंभलेखक म्हणुन मला सागर तायडे महाराष्ट्रात दिसतात. त्यांचे लिखाण हे मग असंघटित कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी असेल, की कौटुंबिक कलह निर्माण होऊ नये यासाठी असेल, या सडेतोड पणे चुकलेल्या राजकीय घडामोडी वर असेल, सामाजिक प्रबोधन करणारे असेल,या धार्मिक संदर्भात असेल, जे जनहिताच्या दृष्टीने योग्य आहे असे त्यांनी लिखाण केले आहे.

महाराष्ट्रात जवळपास साठ दैनिका मध्ये सातत्याने त्यांचे लेख असतात. मग त्यात दैनिक मुक्त नायक कोल्हापूर असेल, या जनतेचा महानायक दैनिक मुंबई मध्ये असेल, दैनिक विश्वपथ मुंबई मध्ये असेल, कोकण सकाळ मध्ये असेल, या मग दैनिक, विदर्भ मतदार अमरावती, भंडारा पत्रिका दैनिक भंडारा मध्ये असेल, या दैनिक चन्द्र धून चंद्रपूर मध्ये असेल, या दैनिक जणसत्य, या दैनिक विश्व विजेता असेल, या दैनिक कटू सत्य असेल, दैनिक देशोन्नती असेल, नागपूरचा दैनिक बहुजन सौरभ असेल,बीड चा आमचा अभिमान असेल,लातूरचा महापर्व,दैनिक अजिंठा टाईम्स ,लातूर प्रभात,युवा छत्रपती,युतीचक्र,नांदेडचे युगांतर,श्रमिक एकजूठ,रिपब्लिकन गार्ड,परभणीचा शिल्पकार अशा अनेक जिल्ह्यातील दैनिका मध्ये त्यांचे आलेले लेख हे सामान्य माणसाला न्याय मिळण्या च्या दृष्टीने प्रबोधनात्मक

असतात. त्यांचा लिखाणा संदर्भात त्यांना बर्याच लोकांनी, निर्भीडपणे लिहणारा स्तंभलेखक म्हणुन अभिप्राय ही दिलेला आहे.

मी मागील पाच वर्षापासून त्यांचे लिखाण वाचतो आहे. त्यांच्या अनेक लेखासंबंधी माझा अभिप्राय ही असतो. असे निर्भीड लेखक फार कमी असतात. अशा चांगल्या लेखकाच्या पाठीशी राहणे म्हणजे समता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेणार्या महापुरुषांच्या विचारांच्या आदर्शाचा सन्मान करणे होय.सागर तायडे यांचा लेख महाराष्ट्रात रोज कोणत्या ना कोणत्या तरी दैनिकात राहतो हे मात्र निश्चित आहे. ते सत्यशोधक कामगार संघटना मुंबई चे संस्थापक सदस्य आहेत. आज ते अध्यक्ष आहेत. ते स्वतंत्र मजदूर युनियन चे महाराष्ट्राचे अध्यक्ष आहे. ते निर्व्यसनी असून, निर्भीड वक्ता आहे. ते असंघटित क्षेत्रातील कामगारांना,नाका कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे नेते असल्याने त्यांना गरिबाची जाणीव आहे. त्यांचे प्रेरणास्थान हे बुद्ध, महात्मा फुले,रावबाहदूर नारायण मेघाजी लोखंडे, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर असल्याने त्यांच्या लेखणीची धार ही सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी असते. त्यांचे हृदय हे विशाल सागरा प्रमाणे आहे. त्यांच्या मनात द्वेष नाही. केवळ माणसाने,माणसाला माणूस म्हणून समजावीत. चुकीच्या दिशेने जाऊ नये. ते गेल्याने माणसाच्या वाट्याला दुःख येतात. माणसे दुःख मुक्त व्हावी या उद्देशाने त्यांचे सातत्याने लिखाण असते. त्यांच्या लिखाणातून अनेकांना खर समजून येते. त्यांना महापुरुषांच्या विचारांची जाणीव होते. ते प्रेरणा घेऊन न्यायासाठी लढण्यास तयार होतात. ती लाट म्हणजे क्रांतिकारी विचार होय. त्यांचा समुह होय. क्रांतीकारी विचारांच्या सागर लाटा या पुस्तकाचे लेखक सागर तायडे मुंबई हे एक निर्भीड लेखक म्हणून सन्मानास पात्र आहे. त्यांच्या ६३ व्या जन्म दिना निमित्याने मी दरवर्षी माझे मनोगत व्यक्त करत असतो. त्यांच्याशी मी नेहमीच बोलतो. पण त्यांच्या दैनिकातील वाचकाशी त्यांच्या जन्म दिनानिमित्या हार्दिक मंगल कामना देतांना आपल्या समोर व्यक्त होतो. त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा.

अविनाश टिपले चंद्रपूर ७८७५९०९८०४

महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त श्री कुमारस्वामी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम

औसा / प्रतिनिधी :- श्री.कुमारस्वामी महाविद्यालयात दिनांक ०२-१०-२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अनिल कांबळे यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले यावेळीमहाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी संसदेचे सचिव विवेक चाबुकस्वार रा.से यो विद्यार्थी प्रतिनिधी अनिकेत क्षीरसागर, क्रीडा प्रतिनिधी विशाल किनीकर, पाटील अजिंक्य, अथर्व पाटील कु. दिशा राठोड शिक्षकेतर कर्मचारी रोहन चव्हाण बाळू बेडगे राहुल कांबळे उपस्थित होते

आरोग्य कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्या आरोपीस पोलीस कोठडी

केज/प्रतिनिधी :- जुन्या भांडणाची कुरापत काढून एका आरोग्य कर्मचाऱ्यास भावकीतील दोघा भावांनी लोखंडी रॉडने केलेल्या मारहाणीत चेहऱ्यावरील हाड फॅक्चर झाल्याची घटना केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे घडली.या प्रकरणी गुन्हानोंद झाला होता.आरोपी युवराज गलांडे यास पोलिसांनी अटक करुन न्यायालया समोर हजार केले असता त्यास ५आक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले आहेत.केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नितीन वासुदेव गलांडे हे गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य कर्मचारी म्हणून कार्यरत असून ते १३ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजता गावा तील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ आपल्या मित्रांसह थांबले होते.याचवेळी त्यांच्या भावकीतील

युवराज गलांडे व राम गलांडे या भावांनी येऊन जुन्या भांडणाची कुरापत काढीत आज तुला जिवे मारतो.अशी जिवे मारण्याची धमकी देत लोखंडी रॉडने मारहाण केली.या मारहाणीत नितीन गलांडे यांच्या चेहऱ्याचे हाड फॅक्चर झाले असून चेहऱ्याला दोन टाके ही पडले आहेत. नितीनगलांडे यांच्यावर केज व अंबाजोगाई लातुर येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. उपचारा दरम्यान दि.२० सप्टेंबर रोजी नितीन गलांडे यांनी दिल्यावरून युवराज गलांडे व राम गलांडे या दोघा भावां विरुद्ध तक्रारी वरून केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.तपास सहाय्यक पोलीस निरीक्षकसुरेश बनसोडे हे करत असताना आरोपी युवराज गलांडे हा मागील दहा दिवसांपासून पोलीसांना गुंगारा देत फरार होता.दि.१ आक्टोबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे व त्यांच्या टीमने त्याला सापळा रचून बार्शी येथुन अटक करण्यात आली.व दिनांक दि.२ आक्टोबर रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयानेदि.५ आक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

चिकन कि पनीर? आरोग्यास जास्त पोषक ठरतो 'हा' खाद्यपदार्थ, जाणून घ्या

शाकाहारी माणसे त्यांच्या आहारामध्ये जास्त पनीरचे सेवन करतात. तर मांसाहारी लोकांमध्ये कोंबडीचे मास खाण्याची सवय जास्त आढळून येते. पनीर आणि चिकनमध्ये नेहमी वादविवाद होत असतात. शाकाहारी माणसे पनीरला चिकनहून अधिक निरोगी मानतात. तर मांसाहारी माणसांना मांसापेक्षा जास्त निरोगी आणि पोषक इतर काहीच वाटत नाही.

पाहायला गेले तर, चिकन आणि पनीर दोघेही शरीरासाठी खूप पोषक असतात. चिकनमध्ये प्रथिने भरपूर असतात. १०० ग्राम चिकनमध्ये ३० ग्राम इतके प्रथिने असतात. हे प्रथिने शरीरातील स्नायूंच्या वाढीसाठी कारणीभूत ठरतात. तसेच शरीरातील ऊर्जेच्या पातळीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. चिकनमध्ये लोह, झिंक, आणि व्हिटॅमिन इ१२ सारखी पोषकतत्त्वे सापडतात, जी शरीरातील रक्तनिर्मितीसाठी आणि मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक असतात.

कमी फॅट असलेले चिकन वजन कमी करण्यासाठीही उपयुक्त आहे, विशेषतः ग्रिल्ड किंवा उकडलेले चिकन वेट लॉससाठी फायद्याचा आहे. पनीर हा दुगजन्य पदार्थ आहे. यामध्ये प्रथिनांसह कॅल्शिअमचा साठा मोठा आहे. १०० ग्राम पनीरमध्ये १त्र८ ते २० ग्राम प्रथिने असतात, जे चिकनच्या तुलनेत कमी आहेत पनीरमध्ये असलेले कॅल्शियम हाडे मजबूत करण्यास मदत करते, तसेच हा पचनसंस्थेसाठी लाभदायक ठरतो.

आदर्श शिक्षिका मंगलताई लोमटे सेवानिवृत्त.

अंबाजोगाई/प्रतिनिधी:- तालुक्यातील ममदापूर पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळे तील सहशिक्षिका श्रीमती मंगलताई शिवाजीराव लोमटे या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या त्यानिमित्त शिक्षकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. श्रीमती मंगलताई लोमटे यांची ओळख उपक्रम शील,विद्यार्थी प्रिय,आदर्श शिक्षिका अशीआहे.त्यांनी घडवलेले विद्यार्थी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत.यावेळी अध्यक्षस्थानी काँग्रेसचे बीड जिल्हा अध्यक्ष राजेसाहेब देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी नांदुरकर बी.के. हे होते त्याचबरोबर अशोकराव देशमुख,अमर देशमुख,संजय देशमुख, बन्सीधर देशमुख,अक्षय देशमुख,श्रीमती हजारे, मणियारसर,श्रीमतीधपाटे, आव्हाड सर व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवरात्र उत्सव म्हणजेच नवचैतन्य.

माँदेवी हे मांगल्य, चैतन्य, उर्जेचे व शक्तीचे प्रतीक आहे.अनेक कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.कारण माँ दुर्गेचे दुसरे रूप म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडच म्हणावे लागेल. घटस्थापणेपासुन तर दसऱ्यापर्यंत संपूर्ण भारतात आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीचे उत्सहाचे व मांगल्याचे वातावरण पहायला मिळते.माँ दुर्गाची शक्ती अफाट व अनंतकाल आहे. त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही.त्यामुळे संपूर्ण शुभ कार्याप्रसंगी व कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.देवीचे अनेक रूप आपल्याला पहायला मिळते.प्राचीन काळापासून शक्तीच्या उपासनेला खूपच महत्व दिले गेले आहे. शक्तीची उपासना मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी प्रेरणादायी ठरत असते.नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला वेगवेगळी शक्तीची रूपे पहायला मिळते. म्हणजे नवरात्रीमध्ये पृथ्वीतलावर साक्षात देवी प्रगट होत असते.या पृथ्वीतलावर देवी भागवत पुराणानुसार देवींची १०८ शक्तीपीठ असल्याचे सांगण्यात येते.त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पुराणांमध्ये ही आकडेवारी वेगवेगळी सांगीतली आहे.कालिका पुराणांमध्ये २६ , शिवचरित्र पुराणामध्ये ५१,दुर्गा शप्तसती आणि तंत्रचूडामणिमध्ये शक्ती पीठांची संख्या ५२ सांगितली आहे. परंतु साधारणत: ५२ शक्तीपीठांना जास्त महत्व दिले जाते.या शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे एकट्या महाराष्ट्रात आहे हे महाराष्ट्राचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.देवीची साडेतीन शक्तिपीठामध्ये श्री महालक्ष्मी(अंबाबाईचे देऊळ,कोल्हापूर) हे महाराष्ट्रात असलेल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे.श्री रेणुकामाता (माहूर) माहूर हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी दुसरे असून येथील पीठाची देवता रेणुकामाता आहे.रेणुकादेवी तसेच दत्तात्रय आणि परशुराम यांची देखील प्राचीन मंदिरे माहूरगडावर पहायला मिळते.त्यामुळे साडेतीन शक्तिपीठांपैकी हे एक मूळ जागृत पीठ आहे. तुळजाभवानी (तुळजापूर) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी तिसरे शक्तीपीठ आहे.श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे.ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिध्द आहे.महाराष्ट्रातील प्रेरणा शक्ती व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आराध्य दैवत अशी ही तुळजापूरची भवानीदेवी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे.इतिहास व पुरातत्वदृष्ट्या हे मंदिर यादवकालीन मानले जाते.तर काहिंच्या मते हे १७ व्या किंवा १८ व्या शतकातील मानली जाते.व साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान म्हणजे सप्तशृंगी देवी (नाशिक) सप्तशृंगीदेवीला महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे ओंकार रूप समजण्यात येते. शुंभनिशुंभ व महिशासुर या पाशवी शक्तीच्या असुरांचा नाश केल्यावर तप-साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले होते. सह्यांद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत.त्यावरूनच या स्थानाचे नाव सप्तशृंगगड असे पडले. नवरात्र उत्सवामध्ये संपूर्ण भारतात आपल्याला एक वेगळेच मांगल्याचे व नवचैतन्याचे वातावरण पहायला मिळते.कारण लहान-मोठे, आबालवृद्ध संपूर्ण मॉदेवीच्या आराधनेमध्ये तल्लीन असतात व जय माता दी चा जयघोष करीत असतात.त्यामुळे नवरात्रीपासुनच दिवाळीच्या सणाची चाहूल लागते आणि नवरात्रीपासुनच आपण घरांच्या सजावटीला सुरूवात करतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना केल्यानंतर दशमीला विजयादशमी (दसरा)उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो.या दिवसाचे महत्त्व म्हणजे असुरी शक्तीचा नाश व सत्याचा विजय मानलेल्या जाते.दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाचा संहार करून असुरी शक्तीला संपवीले व विजय प्राप्त केली.त्यानिमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. आपण पहातो की नवरात्रीपासुन गुलाबी थंडीला सुरुवात होते. म्हणजे संपूर्ण सृष्टीचे वातावरण या ९ दिवसांमध्ये बदलल्याचे आपल्याला दिसून येते व सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधल्या जाते.त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीदेवतांचे वास्तव्य असल्याचे आपल्याला पहायला मिळते.त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण नागरिकांनी महाराष्ट्र दर्शन करून देवीदेवतांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे.नवरात्रामध्ये आपण मॉदेवीची आराधना करतोच यात दुमत नाही.परंतु निसर्गाला वाचविण्यासाठी देवीला साकडे सुध्दा घातले पाहिजे. कारण दिवसेंदिवस निसर्गाचे संतुलन डगमगल्याने हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यामुळे पशुपक्षी,मानव, जीवजंतू यांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे स्पष्ट दिसुन येते.कारण वाढते प्रदुषण, जंगल तोड यामुळे निसर्ग भयभीत झालेला आहे.याचेच प्रयचित्य पशुपक्षांना भोगावे लागत आहे. आज जंगल तोडीमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी नामशेष झाल्याचे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर चित्ता असे अनेक पशुपक्षी आहेत की ते काही नामशेष झाले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.याकरिता नवरात्र उत्सव लक्षात घेता संपूर्ण भक्तांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.फक्त फोटो शेषन पुरते वृक्षारोपण नसावे तर ९ दिवस वृक्षलागवडीची मोहीम युध्दपातळीवर राबवीली पाहिजे.यात सरकारचा, प्रशासनाचा, सामाजिक संस्थांचा, दुर्गा मंडळे, यांचा सुध्दा सहभाग असायला हवा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईलच मॉदेवी सुध्दा प्रसन्न होईल व आपणा सर्वांना भरपूर आर्शिवाद देईल.कारण वृक्षलागवडीमुळे स्थल, जल, वायु यांचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल.मॉ महालक्ष्मी, रेणुकामाता, तुळजाभवानी, सप्तशृंगी देवीला प्रार्थणा करतो की नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होवो आकार-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर -दक्षिण सर्वत्र सुख-शांती व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे अशी देवीच्या चरणी प्रार्थना करतो.कारण नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने काळाची गरज आहे.कारण वाढते प्रदुषण, जंगलतोड व दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी होने.यामुळे मानव, पशुपक्षी, जीवजंतू व अन्य प्राणी यांचा सर्वांचा जीव धोक्यात आहे.याकरीता नवरात्र उत्सवाच्या पावनपर्वाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून संपूर्ण भारतवासीयांनी इतिहास घडवीने गरजेचे आहे.कारण मॉदेवी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड त्यामुळे आपल्याला वृक्षांच्या जळामुळात, पानात,फुलात,फळात आपल्याला देवीचे अवश्य दर्शन अवश्य होईल. सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके!! शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते!!

****

!! जय माता दी!!

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.

जुईनगर येथे भव्य धम्म रॅली वर्षावास आयोजन

नवी मुंबई / प्रतिनिधी :- बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र ८२८ संघमित्रा महिला मंडळ यांच्या विध्यमाने सालाबादप्रमाणे या वर्षी शनिवार दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता भव्य धम्म रॅली व वर्षावास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पूज्य भदंत डॉ.राहुलरत्न आणि संघ यांच्या नेतृत्वात कार्यक्रम होत आहे,कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती माजी आयुक्त सन्मा. विजय नाहटा साहेब उपस्थित राहून पूज्य भन्ते यांचे आशीर्वाद घेणार आहेत,कार्यक्रमाला संस्कार समिती अध्यक्ष मंगेश पवार,मनोहर मोरे,समाजसेवक जालिंदर औटी,मंगेश गायकवाड,समाजसेवक मिलिंद पवार,मधुकर बद्रीगे आदी मान्यवर रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखेचे

पदाधिकारी सुनील शिर्के,सूर्यकांत सावंत,यशवंत शिंदे, समीर साळवी,शिवदास सकपाळ, बुद्धेश्वर दरेकर मेहनत घेत आहेत. कार्यक्रमाला उपासक, उपासीका यांनी शुभ्र वस्त्र परिधान करून नवरात्री चौक सेक्टर २३ जुईनगर ठिकाणी सकाळी १० वाजता हजर रहाण्याचे आवाहन चिटणीस सिध्दार्थ साळवी यांनी केले आहे.

आपल्या माणसांना इतरांनी अधम्म शिकविण्यापूर्वी आपण त्यांना धम्म शिकविला पाहिजे. बी. बी. मेश्राम

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- बौद्ध समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक उत्थानासाठी भविष्यकालीन दिशा काय असावी? या अनुषंगाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व ज्येष्ठ आंबेडकराईट कार्यकर्त्यांच्या वतीने मैत्रेय, ज्ञानतीर्थ सोसायटी, एन-८, सिडको येथे डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर यांच्या निवासस्थानी २७ सप्टेंबर २०२४ ला सह विचार सभा संपन्न झाली.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात बौद्धाचार्य व्ही. के वाघ म्हणाले की, महाराच्या जातीत जन्माला आलो आणि आपण बुद्ध झालो, अशी आपली स्थिती आहे. निब्बाण म्हणजे काय? अष्टशील म्हणजे काय? हे समजून घेताना बोलावे तसे चालावे, असे आपले बौद्ध म्हणून आचरण असावे. माणसाने शीलवान, स्वाभिमानी व प्रज्ञावान असावे. भौचक्रातील लोभी कोंबडा, विषारी साप व अज्ञानी डुक्कराचे अवलोकन केले असता माणसापेक्षा जनावरे बरी! असे म्हणण्याची वेळ आली आहे.

याप्रसंगी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, २२ डिसेंबर १९५२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सांगितलेल्या अटी व शर्थीचे पालन करून आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञ

बेग हॉट यांची चर्चेतून चालणारी लोकशाही समजून घेणे आवश्यक आहे. बौद्धांसाठी विधीवत स्वतंत्र कायदे निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपल्याकडून पंचशील, त्रिशरण, अष्टशील, दहा पारमिता, २२ प्रतिज्ञा इत्यादी बौद्ध धर्मीय तत्वांचे पालन होऊ शकत नसेल तर त्याची कारणमिमांसा करून निराकरण केले पाहिजे. जेणेकरून अनिष्ठ प्रथांना पायबंद घालता येईल. केवळ कागदोपत्री कृती समिती, कार्यकारिणी निर्माण करून चालणार नाही तर कृतीशील कार्यकर्ते निर्माण करून त्यांना कृती समितीत, कार्यकारिणीत स्थान दिल्यास त्यांच्या पदाला ते न्याय देऊ शकतील. करिता आपण कार्यरत असलेल्या संघटनेत कृतीशील होताना आंधळे, बहिरे व मुकेपणाची भूमिका सोडली तर आपल्या संघटनांचा उत्कर्ष होऊ शकेल परिणामी गटा तटाचे अस्तित्व संपुष्टात येऊन एकजिनसी, एकसंघ बौद्ध समाजाची निर्मिती झाली तर इतर सुद्धा त्यांचा आदर्श घेतील. म्हणून इतरांनी आपल्या माणसांना अधम्म शिकविण्यापूर्वी आपण त्यांना धम्म शिकविला पाहिजे.

बी. टी. बागूल म्हणाले की, अनेक विहारे निर्माण झालीत पण मैत्रीऐवजी शत्रुत्व जोपासले जातात, हे बौद्ध धर्मीयांसाठी योग्य नाही. गौतम पारखे म्हणाले की, आज समाजपरिवर्तनासाठी फारसे कुणीही वेळ द्यायला, कार्य करायला तयार नाहीत. ही या समाजाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. उपासक आणि धम्म गुरू कसा असावा? यावर आपण सजग असले पाहिजे. वृत्ती आणि कृतीत अंतर नसावे. तसेच अनिल थोरात, भिमराव वाघचौरे, जी. एस. दोडवे, भिमराव गाडेकर, धनराज गोंडाणे, लक्ष्मीकांत पट्टेबहादूर, डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर यांनीसुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. अशाप्रकारे बी. टी. बागूल यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची हर्षोल्हासात सांगता झाली.

ग्रामसेवकाच्या उदासीनतावादी धोरणामुळे कामगाराचे नुतनीकरण रोखले

बांधकाम कामगारांचे लाक्षणिक आंदोलन

किनवट/शेख शौकत :–बांधकाम कामगारांचे ९० दिवसांच्या कामाचे प्रमाणणत्र नुतनीकरण केल्याशिवाय त्यांना वैयक्तिक लाभ मिळूच शकत नाही. ग्रामसेवकांच्या आठमुठ्या धोरणांमुळे कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा आणि शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे प्रमाणपत्र नुतनीकरण करा, अथवा प्रमाणपत्राची अट शिथील करा, या मागणीसाठी गांधी जयंतीदिनी किनवट पंचायत समितीसमोर बोधडी खुर्द, प्रधानसांगवीसह काही गावांतील बांधकाम कामगारांनी लाक्षणिक आंदोलन करुन शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. नगरपरिषद असो वा ग्रामपंचायत स्तरावरील सर्वच बांधकाम कामगारांना २०१८ पासून ओळखपत्र प्रमाणपत्र मिळाले आणि त्यानंतर सुरक्षाकिट देखील मिळाल्या. कोरोना काळातही शासनाचे अर्थसहाय्य मिळाले. चालू आर्थिक वर्षातही संसार उपयोगी किट आणि त्यांच्या विद्यार्थी पाल्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार असल्याने बांधकाम कामगारांनी ९० दिवसांचे कामे केलेल्या प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी ग्रामसेवकांकडे मागणी केली. ग्रामपंचायतीने आणि गावपातळीवर विविध एजन्सीजच्या माध्यमातून मग्रारोहयोतून कामे केली जातात. इमारतीसह ओळखपत्र त्यांची मस्टर भरली जातात. त्यांच्या कामाचा मोबदलाही दिला जातो. ग्रामसेवकांनी का नुतनीकरण करु नये ? असा संघटनांसह बांधकाम कामगारांचा शासन व प्रशासनाला सवाल आहे. अशा जाचक अटी रद्दबातल करा किंवा ग्रामसेवक आणि नगरपरिषद प्रशासनाला नुतनीकरण करण्याचे पुन्हा आदेश द्या. मागील आदेशाच्या अवमान प्रकरणी ग्रामसेवकांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी घेऊन २ ऑक्टोबर रोजी किनवट पंचायत समितीसमोर चार गावच्या शेकडो महिला, पुरुष बांधकाम लाक्षणिक आंदोलन केले आहे. ९० दिवसांच्या प्रमाणपत्राची अट रद्दच करा. कामगारांच्या मध्यान भोजनाची व्यवस्था करा. घरकूल योजनेचा लाभ द्या. आरोग्यविषयक सुविधेची अंमलबजावणी करा. विशेष लक्षवेधी मागणी म्हणजे कामगारांच्या विद्यार्थी पाल्यांना पहिलीपासून ते पदव्युत्तर शिक्षणाची हमी आणि शिष्यवृत्तीची ठोस अंमलबजावणी करण्याच्या मुद्यांचा मागणीपत्रात अंतर्भाव केला आहे. बोघडी खुर्द येथे दोन पांदन रस्ते, १२० घरकूले, सार्वजनिक नळयोजनेसह विविध विकास कामे याच कामगारांनी केली. मस्टर देखील भरलीत. मग प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाचीच अडवणूक कशासाठी ? डिसेंबर २०२२च्या गटविकास आदेशाची अधिकाऱ्यांच्या अंमलबजावणीची ग्रामसेवक जर अवहेलना करीत असतील तर कारवाई करुन प्रमाणपत्र नुतनीकरणाची व्यवस्था करा, अन्यथा ती अटच शिथील करा. या मुद्यावर कामगार आणि कामगार संघटना पोहोचल्या आहेत.

आमदार धिरज देशमुख यांनी घेतली श्री मनोज जरांगे पाटील यांची भेट

तब्येतीची केली विचारपूस; मराठा समाजाच्या मागण्यांची सरकारने गांभीर्याने नोंद घ्यावी

लातूर/ प्रतिनिधी :– मराठा समाजाच्या आरक्षणासाठी व न्याय्य हक्कांसाठी लढा देत असलेले संघर्ष योद्धे श्री. मनोज जरांगे पाटील यांची छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी सकाळी भेट घेतली व त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. गेल्या काही दिवसांपासून संघर्षयोद्धे श्री. मनोज जरांगे पाटील यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी त्यांची भेट घेवून तब्येतीची विचारपूस केली. तसेच त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. विनोद चावरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांशीही आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी संवाद साधला.

लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

लातूर :– येथील जवाहर नवोदय विद्यालयात २०२५ –२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता सहावीत प्रवेशासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास ७ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियाची सर्व माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेश अर्ज निशुल्क ऑनलाइन भरण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रथम नवोदय विद्यालय समितीच्या वेबसाइटवरील प्रमाणपत्र डाउनलोड करून घेऊन इंटरनेटवर ऑनलाइन अर्ज भरावा ऑनलाइन अर्ज या वेबसाइटवरुन भरावेत. या प्रमाणपत्रावर पाचवीत शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांचा सही शिक्का, पालकांची सही, विद्यार्थ्याची सही व फोटो असणे आवश्यक आहे. इयत्ता सहावीसाठी निवड चाचणी परीक्षेस बसणारा विद्यार्थी इयत्ता तिसरी, चौथी मध्ये सलगपणे उत्तीर्ण होऊन कोणताही खंड न पडता पाचवीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये लातूर जिल्ह्यात शिकत असावा. त्याचा जन्म १ मे २०१३ ते ३१ जुलै २०१५ (दोन्ही दिवस पकडून) दरम्यानचा असावा. त्याचे पालक लातूर जिल्ह्याचेच रहिवासी असावेत अन्यथा ते प्रवेश अर्ज भरण्यास अपात्र असतील. ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम तारीख २३ सप्टेंबर, २०२४ होती परंतू नवोदय विद्यालय समितीने या मध्ये मुदतवाढ दिलेली असून अंतिम तारीख ७ ऑक्टोबर, २०२४ आहे. प्रवेश परीक्षा १८ जानेवारी २०२५ रोजी जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. इतर मागास (ओ. बी. सी.) प्रवर्गात अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ पूर्वी भारत सरकारचे इतर मागास प्रवर्गाचे (ओ. बी. सी.– फॉर्म नंबर. ०९) जात प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे. एकदा अर्ज भरल्यानंतर त्यात बदल करता येत नसल्याने अर्ज भरताना परीक्षेचे माध्यम, वर्ग, शहरी/ ग्रामीण, मुलगा/मुलगी, जन्म तारीख याची खात्री केल्यानंतरच ऑनलाईन अर्ज जमा करावा. ज्या पालकांनी ७ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत अर्ज भरतांना लिंग (मुलगा/मुलगी), वर्ग (सामान्य / इतर मागास / अनु जाती/ अनु जमाती), क्षेत्र (ग्रामीण/ शहरी), दिव्यांगता आणि परीक्षेचे माध्यम चुकीचे भरले असल्यास ते ८ ऑक्टोबर, २०२४ आणि ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वेबसाईटवर लॉगिन करून ऑनलाईन दुरुस्ती करू शकतात. ९ ऑक्टोबर, २०२४ नंतर कोणताही बदल करता येणार नाही. आधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा प्रभारी बी. डी. शेख ९८१७८३४९३० किंवा व्ही. एच. खिल्लारे ९८६०५६८८४० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्राचार्य संजय पाटील यांनी केले आहे.

आंबेडकरी विचारांची मजदूर चळवळ भारतात यशस्वी करा.- जे.एस. पाटील

कानपूर :– भारतात,ब्राह्मणवादी,गोळवळकरवादी, गांधीवादी,समाजवादी,साम्यवादी,कम्युनिस्टवादी, मार्क्सवादी विचारांच्या कामगार संघटना बहूजन समाजातील कामगार व कर्मचार्यांना सांविधानिक घटनात्मक न्याय आणि हक्क देण्यास अपयशी ठरले आहेत.बहुजन समाजातील असंघटित संघटित कामगार,कर्मचारी,अधिकारी यांनी सांविधानिक घटनात्मक न्याय आणि हक्क मिळविण्यासाठी आंबेडकरी विचारांच्या स्वतंत्र मजदूर युनियन मध्ये सहभागी झाले पाहिजे.तरच सांविधानिक घटनात्मक न्याय आणि हक्क मिळविण्यात आपण बहुजन समाज यशस्वी होऊ शकतो असे माननीय जे एस पाटील राष्ट्रीय अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन यांनी सांगितले. ते अखिल भारतीय बहूजन फेडरेशन,तथा रक्षा श्रमिक महासंघाच्या आर्मापूर,कानपूर उत्तर प्रदेश आयोजित आठव्या राष्ट्रीय अधिवेशनात उद्घाटक म्हणून बोलत होते. या सोहळ्याचे अध्यक्ष फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.अरुण नागदेवे हे होते,तर मुख्य अतिथी फेडरेशनचे राष्ट्रीय सरचिटणीस मुकेश कुमार जताव,हे होते आणि अतिथी– प्यारेलाल दिवाकर,रमेश गौतम,निवड भट्टाचार्य,प्रार्थना मौर्य,कुमार देव,नरेंद्र प्रधान,प्रेमचंदजी,सुनील कुमार,पप्पू सिंग,सती बागडे आणि स्वतंत्र रेल बहुजन मजदूर युनियन के राष्ट्रीय अध्यक्ष मा.महेश चंद्रा, स्वतंत्र मजदूर युनियनचे महाराष्ट्र प्रदेश संयुक्त सचिव गणेश ऊके उपस्थित होते.या अधिवेशनचे सूत्र संचालन अनिल दास यांनी केले,तर उमेश कुमार यांनी आभार मानले.भारताच्या विविध विभागातून रक्षा विभाग (डिफेन्स) युनियनचे पदाधिकारी प्रतिनिधी,अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत प्रज्ञा नाईक तालुक्यात प्रथम

लातूर/प्रतिनिधी :– महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणेच्या वतीने शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या तंत्रस्नेही सहशिक्षिका श्रीमती प्रज्ञा नाईक यांच्या व्हिडिओला लातूर तालुक्यात सर्वप्रथम पारितोषिक मिळाले.

श्रीमती प्रज्ञा नाईक यांची यापूर्वी सांस्कृतिक स्रोत व प्रशिक्षण केंद्र,नवी दिल्ली मार्फत 'रोल ऑफ पपेट्री इन एज्युकेशन इन लाईन विथ एन.इ.पी. २०२०' या प्रशिक्षणासाठी मधापूर,हैदराबाद येथे निवड झाली होती.

या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर,उपाध्यक्ष जितेश चापसी,कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य राम कुलकर्णी,प्रवीण सरदेशमुख,विष्णू सोनवणे,संजय गुरव, केशवराज शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर,कार्यवाह शैलेश कुलकर्णी,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर,शाळेचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे,पर्यवेक्षक संदीप देशमुख,बबन गायकवाड,राजश्री कुलकर्णी,अंजली निर्मळे, शिवशंकर राऊत तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

दसरा महोत्सव, बाभळगाव निमीत्त आयोजित करण्यात आलेल्या रामलीला कार्यक्रमास पोलीस अधीक्षक सोमय मुंडे राहणार उपस्थित

लातूर / प्रतिनिधी :– बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कथा आयोजीत करण्यात आली आहे. या रामलीला कार्यक्रमास लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर रोजी उपस्थितीत राहणार आहेत. दसरा महोत्सवा निमीत्त बाभळगाव येथे नवरात्र महोत्सव समिती, ग्रामपंचायत, सेवा सोसायटी, तंटामुक्त ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने रामलीला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे आयोजीत करण्यात आली आहे. या रामलीला कार्यक्रमास लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर रोजी उपस्थितीत राहणार आहेत. या रामलीला कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम जन्म, रावण तपस्या संपन्न होऊन ही रामलीला शनिवार दि. १२ ऑक्टोबर रोजी मेघनाथ वध, रावण वध, भरत भेट, मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम राज्याभिषेक सादर करुन संपणार आहे. या रामलीला कार्यक्रमाचा सर्व भावीकभक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष नवरात्र महोत्सव समिती बाभळगाव, अध्यक्ष, नवरात्र महोत्सव समिती, बाभळगाव जीवनराव गुंडेराव देशमुख, ग्रामपंचायत सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरंपचं गोविंद देशमुख, विविध कार्यकारी सेवा सोसायटी चेअरमन महादेव गंगाराम जटाळ, व्हा. चेअरमन शिवाजी आप्पाराव जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवराज नागोराव देशमुख व ग्रामस्थ बाभळगाव वतीने करण्यात आले आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ

योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात आले ४६ कोटी ७० लाख रुपये

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दीड कोटींचा लाभ

लातूर :– महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेमध्ये ज्या शेतकऱ्यांनी मागील महिन्यात आधार प्रमाणीकरण केले आहे, अशा राज्यातील ११ हजार ८३६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ४६ कोटी ७० लाख रुपये रक्कम शासनामार्फत नुकतीच वर्ग करण्यात आली आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील ५४९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १ कोटी ५५ लाख रुपये रक्कम बँक खात्यात वर्ग करण्यात आली आहे. या प्रोत्साहनपर लाभ योजनेतंर्गत राज्यात ३३ हजार ३५६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले नसल्याचे शासनाच्या माहे ऑगस्ट २०२४ मध्ये निदर्शनास आले होते. त्यामुळे या शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंतच्या प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळाला नव्हता. या शेतकऱ्यांना १२ ऑगस्ट २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत आधार प्रमाणीकरणाची संधी देण्यात आली होती. या कालावधीत आधार प्रमाणीकरण केलेल्या राज्यातील ११ हजार ८३६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४६ कोटी ७० कोटी रुपये प्रोत्साहनपर लाभाची रक्कम १ ऑक्टोंबर २०२४ रोजी वर्ग करण्यात आली आहे. तसेच जे शेतकरी आधार प्रमाणीकरण करण्यापूर्वी मयत झाले आहेत, अशा शेतकऱ्यांच्या वारसांची नांवे योजनेच्या पोर्टलवर समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या प्रक्रियेनंतर आधार प्रमाणीकरण व योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या योजनेमध्ये सन २०१७–१८, २०१८–१९ व २०१९–२० या तीन वर्षामध्ये कोणत्याही दोन वर्षात बँकेकडून पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेली आहे, अशा राज्यातील एकूण १४ कोटी ५० लाख शेतकऱ्यांना आजपर्यत एकू ५ हजार ३१० कोटी रुपये रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील १ लाख २८ हजार ८८ शेतकऱ्यांना ४१० कोटी ५२ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे.

नागरीकांची नियमातील कामे तात्काळ मार्गी लावा – खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

औसा :–औसा येथील प्रशासकीय इमारतीच्या कार्यालयात सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व जनतेच्या समस्याची सोडवणुक करणे साठी जनता दरबार पार पडला

या बैठकीमध्ये शेतकऱ्यांना राज्यसरकार व केंद्रसरकारकडून मिळणारे अनुदान, पिक विमा, महसुल विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, राष्ट्रीय महामार्ग, सा. बं., जि. प. बांधकाम तसेच पंचायत समिती विभागाच्या व अन्य विभागाच्या संदर्भात तसेच नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांच्या समक्ष नागरिकांच्या ज्या समस्या आहेत व त्यावरील उपाययोजना प्रशासनाला सुचवल्या आजच्या जनता दरबार मधील सर्व तक्रारीची छाननी करून प्रत्येक खातेनिहाय याची यादी बनवली जाणार आहे व या सर्वांचा जिल्हाधिकारी यांच्याकडे असा तक्रारीवर प्रशासनाने काय उपाय योजना व सोडवणूक केली आहे याचा आढावा लवकरच घेतला जाणार आहे या बैठकीमध्ये मा.आ. तथा जिल्हाप्रमुख दिनकर माने ,महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी ,काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल दादा उटगे, महिला आघाडीच्या प्रमुख जयश्रीताई उटगे, संगिताताई लातुरकर, उपजिल्हाप्रमुख बजरंग दादा जाधव, उपजिल्हाप्रमुख संतोष सूर्यवंशी,तालुकाप्रमुख आबासाहेब पवार, काँग्रेस युवा नेते अमर खानापुरे, युवा सेना अधिकारी दिनेश जावळे, महिला युवती प्रमुख श्रद्धाताई जवळगेकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते सुभाष दाजी पवार , तालुका अध्यक्ष शाम साळुंखे, काँग्रेस कमिटीचे ज्येष्ठ नेते शेषराव पाटील, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहर प्रमुख सुरेश दादा भुरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे युवक अध्यक्ष भरत सूर्यवंशी , खरेदी विक्री संघाचे माजी उपाध्यक्ष शेखर चव्हाण, तहसीलदार जी.बी. अडसूळ, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे ,तालुका कृषी अधिकारी ढाकणे तसेच सर्व प्रमुख विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

विधानसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी

राबविले जाणार विविध उपक्रम !

लातूर :– भारत निवडणूक आयोगाकडून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम घोषित होणार आहे. लातूर विधानसभा मतदार संघामध्ये निवडणूक विषयक विविध कामे सुरळीत व कालमर्यादेत पार पाडण्यासाठी तसेच मतदारसंघामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप कार्यक्रमातंर्गत शाळा, महाविद्यालयाच्या ठिकाणी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय दंडाधिकारी निवडणूक निणर्य अधिकारी रोहिणी नेऱ्हे–विरोळे यांनी या अनुषंगाने संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, प्राचार्य, बीलएलओ, पर्यवेक्षक यांची ३० सप्टेंबर, २०२४ रोजी बैठक घेवून सूचना दिल्या. मागील लोकसभा निवडणूकीमध्ये लातूर शहर मतदारसंघामध्ये मतदान जनजागृती संदर्भात मतदार जागृती रॅली, विविध स्पर्धा, विधाता गट स्थापन करणे, पालक मेळावा, स्वाक्षरी मोहित, सेल्फी पॉईंट तयार करणे, दिव्यांग मतदारांना संकल्प पत्र देणे, चुनावी पाठशाला इत्यादी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले होते. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनीदेखील आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये जास्तीत जास्त मतदान करुन लोकशाही बळकट करण्याचे व लातूर शहर मतदरसंघाची मतदान टक्केवारी वाढविण्याचे आवाहन लातूर शहर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निणर्य अधिकारी श्रीमती रोहिणी नेऱ्हे– विरोळे यांनी केले आहे. तसेच मागील लोकसभा निवडणूकीमध्ये ज्या शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य, बीएलओ, पर्यवेक्षक यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टिने चांगल्या प्रकारे उपक्रम राबविले अशा १० शाळा, महाविद्यालयांना मतदान जनजागृती (स्वीप) अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देवून यावेळी सन्मानित करण्यात आले. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सौदागर तांदळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार गणेश सरोदे , नोडल अधिकारी स्वीप कक्ष निवृत्ती जाधव, जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी (शि) मधुकर ढमाले, वरंवटी जिल्हा परिषद प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर गिल्डा यांच्यासह संबंधित शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य, बीएलओ, पर्यवेक्षक, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE